तातडीचे/कालमर्यादा

क्र: अपिले/एकत्रीकरण/पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.६०/ब- २७९ दिनांक: ७/१२/२०११

पुनर्रचना कक्ष,
विक्रीकर भवन, माझगांव,
मुंबई ४०००१०.

# कार्यालयीन आदेश

**विषय:- अपिल कार्यभारांचे एकत्रीकरण /निर्मिती - विक्रीकर सहआयुक्त (अपिले)**

संदर्भ:- (१) शासन निर्णय क्र. विकआ १२०५/प्र.क्र. ११९/वि.प्र. ४, मुंबई दि. ०५.०१.२००७.
(२) शासन निर्णय क्र. विकआ १२०५/प्र.क्र. २४५/वि.प्र. ४, मुंबई दि. २९.०१.२०१०.
(३) शासन निर्णय क्र. विकआ-१२११/प्र.क्र. ६६/वि.प्र.४, मुंबई दि. २५.०३.२०११.
(४) शासन निर्णय क्र. विकआ-१२११/प्र.क्र. ६६/वि.प्र.४, मुंबई दि. १३.०७.२०११.
(५) शासन निर्णय क्र. विकवि १२११/प्र.क्र.२९१/वि.प्र.४, मुंबई दि. १८.११.२०११.

विक्रीकर खात्यांतर्गत सध्या कार्यरत असलेल्या विक्रीकर सहआयुक्त (अपिले) व विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्याकडील प्रलंबित अपिल प्रकरणांचा आढावा घेतल्यानंतर आणि मुल्यवर्धित करप्रणाली अंतर्गत अपिलांची अपेक्षित कमी संख्या विचारात घेऊन, तसेच विक्रीकर खात्याच्या पुनर्रचनेच्या, संदर्भ क्र. ५ मधील शासन निर्णयान्वये मंजूर केलेली पदे विचारात घेऊन, सध्याच्या अपिले कार्यभारांचे (पदांचे नव्हे) खालीलप्रमाणे, पुनर्रचनेशी अनुरुप एकत्रीकरण करण्यात येत आहे.

२. मुल्यवर्धित करप्रणालीमध्ये स्वयंनिर्धारणेवर भर देण्यात आलेला असून एकूण पारित केल्या जाणाऱ्या वैधानिक आदेशाची संख्या कमी होणार असून, प्रतिवर्षी दाखल होणारी अपिले कमी होणार आहेत. वरिष्ठ दर्जाचा अधिकारी त्यांचा विभागात असलेला विस्तृत व दीर्घ अनुभवामुळे अपिलाद्वारे योग्य व गुणवत्तापूर्ण निर्णय घेऊ शकतो. अपिल आदेशातील निर्णयांचा परिणाम भविष्यातील महसुलावर होत असल्याने व अशा आदेशांची गुणवत्ता अत्युच्च राहण्याच्या दृष्टीने, अपिल प्रकरणे हाताळण्यासाठी अनुभवी व वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांची गरज आहे. अपिल प्रकरणांच्या गुणवत्तापूर्ण निपटाऱ्यासाठी यापुढे विभागामध्ये फक्त विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांची पदे राहतील.

३. सध्याच्या विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्या १९ कार्यभारांचे खालील विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांच्या १७ कार्यभारांमध्ये (सध्याचे नऊ कार्यभार व आठ नवीन कार्यभार ) एकत्रीकरण करण्यात येत आहेत. यापुढे विभागामध्ये एकूण १७ विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार राहतील.

| अ. क्र. | दि. ०१.०१.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | स्तंभ २ मधील कार्यभारास एकत्रीकरणाने जोडावयाचे वि.उ.आ.(अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १, मुंबई | --- | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (१), मोठे करदाते कक्ष (१), नोंदणी शाखा, मध्यवर्ती भांडार कक्ष, समुपदेशन कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (१), मोठे करदाते कक्ष (१), नोंदणी शाखा, मध्यवर्ती भांडार कक्ष, समुपदेशन कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) |
| २ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) २, मुंबई | --- | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), मोठे करदाते कक्ष (२), सर्वेक्षण शाखा, तपासणी ज्ञाप कक्ष, नमुना- ७०४ कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), मोठे करदाते कक्ष (२), सर्वेक्षण शाखा, तपासणी ज्ञाप कक्ष, नमुना- ७०४ कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ३ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ३, मुंबई | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ५, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), मोठे करदाते कक्ष (३), विवरण शाखा, वसुली शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), मोठे करदाते कक्ष (३), विवरण शाखा, वसुली शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ४ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ४, मुंबई | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ६, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (४), मोठे करदाते कक्ष (४), व्यवसायकर शाखा व इतर कायदे, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (४), मोठे करदाते कक्ष (४), व्यवसायकर शाखा व इतर कायदे, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ५ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ५, मुंबई (नवीन कार्यभार) | (१) विक्रीकर उपआयुक्त (अपिले) १, मुंबई (२) विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ३, मुंबई | मुंबईतील मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (१), परतावा लेखा परीक्षण शाखा (१), अन्वेषण शाखा (अ), सीमा तपासणी नाके शाखा, जुनी | मुंबईतील मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (१), परतावा लेखा परीक्षण शाखा (१), अन्वेषण शाखा (अ), सीमा तपासणी नाके शाखा, जुनी |

| अ. क्र. | दि. ०१.०१.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | स्तंभ २ मधील कार्यभारास एकत्रीकरणाने जोडावयाचे वि.उ.आ.(अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) | अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ६ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ६, मुंबई (नवीन कार्यभार) | (१) विक्रीकर उपआयुक्त (अपिले) २, मुंबई (२) विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ४, मुंबई | मुंबईतील मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (२), परतावा लेखा परीक्षण शाखा (२), अन्वेषण शाखा (ब), तपासणी ज्ञाप कक्ष, नवीन अपिले मुंबई विक्रीकर कायदा विभाग, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (२), परतावा लेखा परीक्षण शाखा (२), अन्वेषण शाखा (ब), तपासणी ज्ञाप कक्ष, नवीन अपिले मुंबई विक्रीकर कायदा, जुनी अपिले (मुं.वि.का. अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ७ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ठाणे | विक्रीकर उपआयुक्त (अपिले), ठाणे | जुनी व व्हॅटमधील अपिले | ठाणे विभाग |
| ८ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), रायगड (नवीन कार्यभार) | विक्रीकर उपआयुक्त (अपिले), रायगड | जुनी व व्हॅटमधील अपिले | रायगड विभाग |
| ९ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), पालघर (नवीन कार्यभार) | विक्रीकर उपआयुक्त (अपिले), ठाणे ग्रामीण (पालघर) | जुनी व व्हॅटमधील अपिले | पालघर विभाग |
| १० | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १, पुणे | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) १, पुणे | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जुनी व व्हॅटमधील अपिले | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जुनी व व्हॅटमधील अपिले |
| ११ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) २, पुणे (नवीन कार्यभार) | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) २, पुणे | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्र वगळून पुणे विभागातील जुनी व व्हॅटमधील अपिले | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्र वगळून पुणे विभागातील जुनी व व्हॅटमधील अपिले |
| १२ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), कोल्हापूर (नवीन कार्यभार) | विक्रीकर उपआयुक्त (अपिले), कोल्हापूर | जुनी व व्हॅटमधील अपिले | कोल्हापूर विभाग |

| अ. क्र. | दि. ०१.०१.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | स्तंभ २ मधील कार्यभारास एकत्रीकरणाने जोडावयाचे वि.उ.आ.(अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १३ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), सोलापूर (नवीन कार्यभार) | विक्रीकर उपआयुक्त (अपिले), सोलापूर | जुनी व व्हॅटमधील अपिले | सोलापूर विभाग |
| १४ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), नाशिक | (१) विक्रीकर उपआयुक्त (अपिले), नाशिक (२) विक्रीकर उपआयुक्त (अपिले), धुळे | जुनी व व्हॅटमधील अपिले | नाशिक व धुळे विभाग |
| १५ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), औरंगाबाद | विक्रीकर उपआयुक्त (अपिले), औरंगाबाद | जुनी व व्हॅटमधील अपिले | औरंगाबाद विभाग |
| १६ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), नागपूर | विक्रीकर उपआयुक्त (अपिले), नागपूर | जुनी व व्हॅटमधील अपिले | नागपूर क्षेत्र |
| १७ | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), अमरावती (नवीन कार्यभार) | (१) विक्रीकर उपआयुक्त (अपिले), अमरावती (२) विक्रीकर उपआयुक्त (अपिले), नांदेड | जुनी व व्हॅटमधील अपिले | अमरावती व नांदेड विभाग |

४. वरीलप्रमाणे स्तंभ ३ मधील अपिल कार्यभार हे स्तंभ २ मधील कार्यभारांशी एकत्रित केल्यामुळे, स्तंभ ३ मधील कार्यभार दि. ३१.१२.२०११ नंतर शिल्लक राहणार नाहीत. दिनांक ०१.०१.२०१२ पासून स्तंभ २ मधीलच सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार कायम राहतील. तसेच विक्रीकर उपआयुक्त (नोंदणी) १, मुंबई यांचेकडे नोंदणी शाखेतील अपिले [ विक्रीकर सहआयुक्त (अपिले-१) मुंबई यांचेकडील नोंदणी शाखेतील अपिले ] वगळता राहतील.

५. <u>कार्यभार एकत्रीकरण करताना घेण्याची दक्षता</u> : अपिल कार्यभारांचे एकत्रीकरण करताना इतर बाबींबरोबरच प्रामुख्याने खालील नोंदवहयांमधील <u>नोंदी अद्ययावत करुन, त्यांचे गोषवारे काढून</u> व शेवटी त्याविषयी प्रमाणित करुन, कार्यभार देणाऱ्या व घेणाऱ्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह, <u>सर्व नोंदवहयांचे हस्तांतरण करावे.</u>

| अ.क्र. | नोंदवहीचा क्रमांक | नोंदवहीचे नांव |
|---|---|---|
| १ | २३ | अपिल अर्ज नोंदवही |
| २ | ३ | दैनंदिनी अर्ज नोंदवही |
| ३ | २७ | अपिल आदेश नोंदवही |
| ४ | ५ | अनौ. संदर्भ नोंदवही |
| ५ | १८ | सुधारीत आदेश नोंदवही |
| ६ | ५६ | स्थगिती आदेश नोंदवही |
| ७ | १९ | धारिणी हालचाल नोंदवही |
| ८ | २१ | पुन:स्थापना नोंदवही |
| ९ | ८ | लेखा परीक्षण नोंदवही |
| १० | १९ | धारिण्या अभिलेख शाखेकडे सादर केल्याची नोंदवही |
| ११ | | प्रलंबित अपिले नोंदवही |
| १२ | | आवक/जावक नोदवही |

६. नोंदवहयातील नोंदी अद्ययावत केल्यानंतर त्याआधारे सर्व प्रलंबित जीवित अपिल प्रकरणांची, तसेच निकालात काढलेल्या अपिल प्रकरणांची यादी, धारिण्यांसह, मोजणी करुन, त्या ताब्यात द्याव्यात/घ्याव्यात. कार्यभार प्रमाणपत्रामध्ये त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. ताब्यात दिलेल्या/घेतलेल्या नोंदवहया व धारिण्यांची यादी ४ प्रतीत तयार करुन कार्यभार देणाऱ्या व घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रत्येकी १ प्रत स्वत:कडे ठेवावी व १ प्रत संबंधित प्रशासन सहआयुक्तांना व अपर विक्रीकर आयुक्तांना द्यावी.

७. मुंबई बाहेरील विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचेकडे जर त्यांच्या कार्यक्षेत्राऐवजी इतर कार्यक्षेत्रातील काही अपिल धारिण्या असतील, तर त्यांनी त्या संबंधित कार्यक्षेत्राच्या विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांच्याकडे योग्य ती काळजी घेवून हस्तांतरीत कराव्यात व तसे संबंधित व्यापा-यांना कळवावे. म्हणजेच मुंबई बाहेरील विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचेकडे फक्त त्यांच्या कार्यक्षेत्रातीलच अपिल धारिण्या असतील.

८. संबंधित कायम राहणा-या विक्रीकर सहआयुक्तांनी याबाबतची पुढील कार्यवाही तातडीने दि. ३१.१२.२०११ पुर्वी पूर्ण करावी. नवनिर्मित विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचेकडील एकत्रीकरणाची कार्यवाही दि. १०.०१.२०१२ पूर्वी करावी. तसेच कार्यभारांच्या एकत्रीकरणाबाबत व यापुढे संबंधित प्रकरणे कोणत्या कार्यभारातून हाताळली

जाणार आहेत त्या कार्यभाराचा क्रमांक व कार्यालयीन जागेबाबत, संबंधित व्यापाऱ्यांना वेळीच कळवावे. तसेच ज्यांचे आदेशावर उपआयुक्त (अपिले) यांच्याकडे अपिल दाखल केले जाते, त्या सर्व अधिकाऱ्यांनीही वरील बदलांची नोंद घेऊन त्याप्रमाणे त्यांचेकडून पारित होणाऱ्या आदेशात, निर्देशित केलेल्या अपिल प्राधिकाऱ्याचा उल्लेख करण्याबाबत कळवावे.

उपरोक्त सूचना या सर्वसमावेशक नसून मार्गदर्शक स्वरुपाच्या आहेत, कोणतीही प्रलंबित कार्यवाही कालबाहय होणार नाही, सर्व कागदपत्रांचे योग्यरित्या हस्तांतरण व्हावे व शासनाची महसूल हानी होणार नाही हे मूख्य सूत्र लक्षात घेऊन, विक्रीकर सहआयुक्त (प्रशासन) यांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभागात, योग्य ती काळजी घेणे व वेळीच नियोजन करुन प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. संबंधीत विक्रीकर सहआयुक्त यांनी एकत्रीकरणाचे काम योग्य रित्या पुर्ण झाल्याचे अहवाल अपर विक्रीकर आयुक्त (मुंबई विक्रीकर कायदा) यांच्याकडे सादर करावे.

(संजय भाटिया)
विक्रीकर आयुक्त ,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी</u> :-

१. सर्व अपर विक्रीकर आयुक्त.
२. मुख्य दक्षता अधिकारी.
३. सर्व विक्रीकर सहआयुक्त.
४. विक्रीकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी.
५. विक्रीकर आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासने.
६. अपर विक्रीकर आयुक्त (आस्थापना) कार्यालयातील सर्व कार्यासने.
७. विक्रीकर सहआयुक्त (मुख्यालय-१) यांना (वैधानिक आदेश/अधिसूचना संबंधाने)
८. सर्व विक्रीकर उपआयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी.

<u>प्रत सादर</u> :-

१. मा. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.